# श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

# यशवंत महाविद्यालय नांदेड

## सत्रारंभ व्याख्यान-२०२३-२४ : अहवाल

मराठी विभाग यशवंत महाविद्यालय नांदेड यांच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे यांच्यासूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या आरंभी बी.ए., बी.एस्सी.आणि बी.कॉम.प्रथम वर्ष वर्गात द्वितीय भाषा किंवा मुख्य भाषा म्हणून मराठी विषयघेतलेल्या विद्यार्थ्यांना विभागाची, महाविद्यालयाची तसेच मराठी भाषा व साहित्यातील निरनिराळयाव्यवसाय व नोकरीच्या संधी या संदर्भातील माहिती मिळावी या हेतूने सत्रारंभ व्याख्यानाचे ठरले.यासंदर्भात विभागात विभागप्रमुख डॉ.संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली एक छोटेखानी बैठक घेऊन या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोणाला बोलवावे? तसेच कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळेत कार्यक्रम घ्यावा? या संदर्भात चर्चा करण्यात आली.

लेखक,अभ्यासक,वक्ते अशा निरनिराळया रुपात बैठकीतील चर्चेअंती मराठी भाषा आणि साहित्य यांच्याशी निगडित असलेले के.आर.एम. महाविद्यालय,नांदेड येथील मराठी विभाग प्रमुख डॉ.व्यंकटी पावडे कार्यक्रमासाठी बोलावणे उचित ठरेल, असे ठरले.त्यांनी 'मराठी भाषा,साहित्य व संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मांडणी करावी असे ठरले.या संदर्भात त्यांच्याशी संवाद साधला असता, ते स्वतः महाविद्यालयाचे आणि मराठी विभागाचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी आनंदाने होकार दिला.

यासंदर्भात माननीय प्राचार्य महोदयांना कल्पना देऊन कार्यक्रमाची तारीख व वेळ निश्चित करण्यात आली.त्यानुसार प्रस्तुत कार्यक्रम दिनांक ०७ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ११:५० वाजता भाषा प्रयोगशाळा सभागृहात घेण्याचे ठरवण्यात आले.प्रस्तुत कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग वाढावा म्हणून बी.एस्सी.प्रथम वर्ष आणि बी.ए.द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांना भित्तीपत्रक बनविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळून चार भित्तीपत्रके तयार केली.

पूर्व नियोजनानुसार दिनांक ०७ ऑगस्ट,२०२३ रोजी सत्रारंभा- निमित्त डॉ.व्यंकटी पावडे यांचे व्याख्यान संपन्न झाले.त्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात खालील महत्त्वपूर्ण मुद्द्यांची मांडणी केली.विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, 'स्वार्थ, मत्सर, खोटारडेपणा यामुळे आपला भवताल अंधारून आलेला आहे.माणूस दिवसेंदिवस संवेदनाहीन होतो आहे परिणामी समाजाचे आरोग्य बिघडले आहे आणि यासाठी वैद्यकशास्त्र किंवा तंत्रशास्त्र यांच्याकडून अपेक्षा केली जात आहे; परंतु भवतालातील या कुरुपतेला बाजूला सारून स्वतःचे आणि समाजाचे आयुष्य सुंदर करायचे असेल तर मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या अभ्यासाकडे वळणे हा सर्वोत्तम पर्याय' असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे ह्या होत्या.

मराठी साहित्यातील विविध उदाहरणे देत डॉ.पावडे पुढे म्हणाले की, 'व्यक्ती म्हणून आपले आदर्श निवडण्यात आणि समाज म्हणून आपली प्राधान्ये निवडण्यात आपली गफलत होते आहे. परिणामी तरुण पिढी तत्त्वज्ञानाच्या व्यासंगात गुंतून जाण्याऐवजी तंत्रशरण बनते आहे. तरुणाईची ही शरणागतता थांबवायची असेल तर यशवंत महाविद्यालयाच्या मराठी

विभागाकडून 'वाचन कट्ट्यासारखे' जे उपक्रम घेतले जातात, ते सर्वार्थाने फलदायी ठरणारे आहेत. यामुळेच भाषा शिक्षणाकडे केवळ एक विषय म्हणून न पाहता व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्या- साठीचा सर्वोत्तम पर्याय म्हणून पाहायला हवे,' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.अध्यक्ष मार्गदर्शनात डॉ.कविता सोनकांबळे यांनी 'भवतालातील प्रतिकूलतेमुळे हताश न होता सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पाहायची सवय जडली तर समग्र जीवनामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडू शकते. यामुळे विद्यार्थ्यांनी प्रश्नांकडे न पाहता प्रश्नांतून उद्भवणाऱ्या संधींकडे पाहायला हवे', असे आवाहन केले.डॉ.विश्वाधार देशमुख यांनी 'भाषेचा शोध' हा मानवी उत्क्रांती प्रक्रियेतील मध्यवर्ती टप्पा असून भाषा नसती तर संस्कृतीचा जन्म झाला नसता यामुळे सांस्कृतिक उत्क्रांतीसाठी भाषा आणि साहित्य या मूलभूत गरजा आहेत हे लक्षात घेऊन आपल्या शैक्षणिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी व्हायला हवी' यावरती आपल्या मनोगतात भाष्य केले.विभागप्रमुख डॉ.संजय जगताप यांनी मराठी विभागाच्या आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेऊन हा विभाग विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबविण्यातकसा आघाडीवर आहे, याचा आढावा प्रास्ताविकात घेतला.कार्यक्रमाच्या आरंभी नुकतेच दिवंगत झालेले मराठीतील महत्त्वाचे कवी पद्मश्री ना.धों. महानोर यांना श्रद्धांजली करण्यात आली.यानंतर बी.ए. आणि बी.एस्सी.च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चार भित्तीपत्रकांचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. 'पद्मश्री ना.धों.महानोर यांना आदरांजली','स्वातंत्र्याचे स्मरण' आणि 'आठवणीतील कविता' अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी ही भित्तिपत्रके तयार केली होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली मद्रेवार,पाहुण्यांचा परिचय प्रगती तेलंग तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी सुर्यवंशी यांनी केले.प्रस्तुत कार्यक्रमात विभागात नव्याने रुजू झालेले डॉ.शिवाजी सुर्यवंशी यांचा विभागाच्या वतीने उपप्राचार्या डॉ.कविता सोनकांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.सत्रारंभ व्याख्यानाच्या यशस्वितेसाठी शुभम राठोड, निकिता गाडेकर,पूजा तोटेवाड,मीनाक्षी कानोजी यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम संपल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांसोबत मराठी भाषा, साहित्य तसेच यामधून तयार होणाऱ्या नोकरी व व्यवसायाच्या संधी या अनुषंगाने चर्चा केली.पाहुण्यांनी देखील दिलखुलासपणे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.अशाप्रकारे मराठी विभागाच्या वतीने आयोजित सत्रारंभ व्याख्यानाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचे मराठी भाषा व साहित्य संस्कृतीबद्दल उद्बोधन होऊन अभ्यासाच्या काही नव्या दिशा विद्यार्थ्यांपुढे खुल्या झाल्या.

विभागप्रमुख

उद्याचा
मराठवाडा

# सुंदर आयुष्यासाठी अभ्यास आवश्यक

## डॉ. व्यंकटी पावडे : साहित्य, भाषा आणि संस्कृती जपण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी) - स्वार्थ, मत्सर, खोटारडेपणा यामुळे आपला भवताल अंधारून आलेला आहे. माणूस दिवसेंदिवस संवेदनाहीन होतो आहे. परिणामी समाजाचे आरोग्य बिघडले आहे आणि यासाठी वैद्यकशास्त्र किंवा तंत्रशास्त्र यांच्याकडून अपेक्षा केली जात आहे; परंतु भवतालातील या कुरूपतेला बाजूला सारून स्वत:चे आणि समाजाचे आयुष्य सुंदर करायचे असेल तर मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या अभ्यासाकडे वळणे हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे प्रतिपादन भाषा, साहित्य व संस्कृतीचे अभ्यासक डॉ. व्यंकटी पावडे यांनी केले. ते यशवंत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'सत्रारंभ' व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे या होत्या.



मराठी साहित्यातील विविध उदाहरणे देत डॉ. पावडे पुढे म्हणाले की, व्यक्ती म्हणून आपले आदर्श निवडण्यात आणि समाज म्हणून आपली प्राधान्ये निवडण्यात आपली गफलत होते आहे. परिणामी तरुण पिढी तत्त्वज्ञानाच्या व्यासंगात गुंतून जाण्याऐवजी तंत्रशरण बनते आहे. तरुणाईची ही शरणागतता थांबवायची असेल तर यशवंत महाविद्यालयाच्या मराठी विभागाकडून 'वाचन कट्ट्यासारखे' जे उपक्रम घेतले जातात, ते सर्वार्थाने फलदायी ठरणारे आहेत. यामुळेच भाषा शिक्षणाकडे केवळ एक विषय म्हणून न पाहता व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्यासाठीचा सर्वोत्तम पर्याय म्हणून पाहायला हवे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्ष मार्गदर्शनात डॉ. कविता सोनकांबळे यांनी 'भवतालातील प्रतिकुलतेमुळे हताश न होता सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पाहायची सवय जडली तर समग्र जीवनामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडू शकते. यामुळे विद्यार्थ्यांनी प्रश्नांकडे न पाहता प्रश्नांतून उद्‌वणाऱ्या संधींकडे पाहायला हवे' असे आवाहन केले.

डॉ. विश्वाधार देशमुख यांनी 'भाषेचा शोध' हा मानवी उत्क्रांती प्रक्रियेतील मध्यवर्ती टप्पा असून भाषा नसती तर संस्कृतीचा जन्म झाला नसता. यामुळे सांस्कृतिक उत्क्रांतीसाठी भाषा आणि साहित्य या मूलभूत गरजा आहेत, हे लक्षात घेऊन आपल्या शैक्षणिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी व्हायला हवी यावरती आपल्या मनोगतात भाष्य केले.

विभागप्रमुख डॉ. संजय जगताप यांनी मराठी विभागाच्या आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेऊन हा विभाग विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबविण्यात कसा आघाडीवर आहे, याचा आढावा प्रास्ताविकात घेतला.

कार्यक्रमाच्या आरंभी नुकतेच दिवंगत झालेले मराठीतील महत्त्वाचे कवी पद्मश्री ना.धों. महानोर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर बी.ए. आणि बी.एस्सी.च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चार भित्तीपत्रकांचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली मद्रेवार, पाहुण्यांचा परिचय प्रगती तेलंग तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांनी केले. सत्रारंभ व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी शुभम राठोड, निकिता गाडेकर, पूजा तोटेवाड, मिनाक्षी कानोजी यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Main Edition
Aug 8, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com









REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA



